03 OCT 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजकारणाचे शुद्धीकरण व्हावे : चौसाळकर


## डॉ. अशोक चौसाळकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महात्मा गांधी यांना अभिप्रेत मूल्यांच्या पायावर आजच्या राजकारणाचे शुद्धीकरण करण्यास कटिबद्ध व्हावे, हाच आजच्या दिवसाचा संदेश आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, महात्मा गांधी यांची न्यायविषयक भूमिका सुस्पष्ट होती. लोकमान्य टिळकांनी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार या चार संकल्पना भारताला दिल्या. तथापि, त्या अनुषंगाने त्यांना मर्यादित काम करता आले. महात्मा गांधी यांनी या चार संकल्पना खऱ्या अर्थाने समृद्ध करण्याचे काम केले. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, १९३७ मध्ये वर्धा येथे झालेल्या शैक्षणिक परिषदेला महात्मा गांधी उपस्थित होते. यावेळी नई तालीम पद्धती उद्‌घोषित केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनीही मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते प्रा. राम बापट लिखित 'स्वराज्य आणि राज्य संस्था' आणि प्रा. भारती पाटील संपादित 'लोकमान्य आणि महात्मा' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी, महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, श्रीकृष्ण महाजन, नंदकुमार मोरे, अवनिश पाटील, आर. व्ही. गुरव, शरद बनसोडे, पी. एस. कांबळे, प्रमोद वासंबेकर, दशरथ पारेकर आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीनिमित्त प्रा. राम बापट आणि प्रा. भारती पाटील यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत भारती पाटील, प्रमोद पाटील, अशोक चौसाळकर, विलास शिंदे.**

पुढारी

# म. गांधी यांच्या मूल्यांवरच राजकारणाचे शुद्धीकरण व्हावे

## डॉ. चौसाळकर; विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर** : महात्मा गांधी यांना अभिप्रेत मूल्यांच्या पायावर आजच्या राजकारणाचे शुद्धीकरण करण्यास प्रतिबद्ध व्हावे, हाच आजच्या दिवसाचा संदेश आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. चौसाळकर म्हणाले, महात्मा गांधी यांची न्यायविषयक भूमिका सुस्पष्ट होती. आयुष्यात कितीही मोठे आमिष अगर सत्ताशक्ती हाती आली, तरीसुद्धा कोणत्याही परिस्थितीत न्यायाने वागणे न सोडणारी माणसे त्यांना अभिप्रेत होती. आजच्या राजकारणाच्या संदर्भात हे विधान अधिक लागू पडणारे आहे. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते प्रा. राम बापट लिखित 'स्वराज्य आणि राज्यसंस्था' आणि प्रा. भारती पाटील संपादित 'लोकमान्य आणि महात्मा' या पुस्तकांचे प्रकाशन झाले. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. प्रमोद वासंबेकर उपस्थित होते.

सकाळ

# संशोधन, उद्योगामध्ये देश प्रगतिपथावर : डॉ. सावंत

## शिवाजी विद्यापीठ, बिर्ला इन्स्टिट्यूटतर्फे स्तुती कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २ :** देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संशोधन आणि उद्योग यांना चालना देण्यासाठी विविध उपक्रम घेतले जात आहेत. त्यामुळे याबाबतीत देश प्रगतिपथावर आहे. स्तुतीसारख्या उपक्रमांमुळे समाजात व्यवसाय म्हणून नवोपक्रमाची स्वीकारार्हता वाढेल, असे प्रतिपादन गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. गोवा येथे झालेल्या स्तुती कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, शिवाजी विद्यापीठ, बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी अ‍ॅण्ड सायन्स पिलानी, गोवा यांच्यातर्फे स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मुख्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले, 'आपले पंतप्रधान उदयोन्मुख भारताच्या स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षात संशोधन आणि विकासामध्ये बेंचमार्क स्थापित करण्यासाठी आपले मोठे प्रयत्न करत आहेत, जे देशाला जागतिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर खेचून आणतील.'

शिवाजी विद्यापीठाच्या सैफ - सीएफसी अधिविभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे म्हणाले, 'आता संशोधक प्राध्यापक आणि उद्योजकांनी एकत्र येऊन मेक इन इंडियामध्ये सहभागी व्हावे आणि अशी अत्याधुनिक साधने विकसित करण्याचा प्रयत्न करावा. ही मोठी गुंतवणूक असल्याकारणाने उद्योजकांचा यात सहभाग दिसत नाही; परंतु अशा कंपनी स्थापन व्हायला हव्यात. ज्यामुळे अशा प्रकारची उपकरणे भारतातच नाहीत, तर जगभर विकली जाऊ शकतात आणि त्यांना नक्कीच मोठी बाजारपेठ मिळेल'.

सकाळ

# दूरशिक्षणतर्फे एमबीए रिक्त जागासाठी आज प्रवेश फेरी

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमासाठी मागील वर्षी व चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठातर्फे घेतलेली प्रवेश परीक्षा दिली होती, अशा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पहिल्या टप्प्यात झाली आहे. तथापि, ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा देऊनही ही प्रवेश निश्चित केलेला नाही, त्याच्यासाठी सोमवारी (ता. ३) सकाळी १०.३० वाजता प्रवेश फेरी होणार आहे, अशी माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली.

डॉ. बनसोडे म्हणाले, 'एमबीए' अभ्यासक्रम हा विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांच्या मान्यतेने सुरू असून त्यात ३६० जागासाठी विध्यार्थ्यांना प्रवेशित होता येणार आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, उद्योजक, व्यावसायिक, प्रोफेशनल आदी अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. मागील वर्षी व शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असून ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही अशासाठी तत्काळ प्रवेश फेरीच्या माध्यमातून जास्तीत जास्त विध्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेली एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी मुख्य कार्यालय, दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ येथे प्रत्यक्ष विहित कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.



लोकमत

# दूरशिक्षण केंद्रामार्फत आज प्रवेश फेरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी मागील वर्षी आणि यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली होती. अशा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पहिल्या टप्प्यात झाली आहे. मात्र, ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा देऊनही अजूनही प्रवेश निश्चित केलेला नाही. त्याच्यासाठी आज, सोमवारी सकाळी साडेदहा वाजता दूरशिक्षण केंद्रात रिक्त जागांसाठी प्रवेश फेरीचे आयोजन केले असल्याची माहिती उपकुलसचिव डॉ.एन.जे. बनसोडे यांनी रविवारी दिली.

पुढारी

# विद्यापीठात दूरशिक्षण केंद्रामार्फत एमबीए रिक्त जागांसाठी आज प्रवेश फेरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रामार्फत सोमवारी (दि.३) एमबीए (डिस्टन्स मोड) अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांसाठी विशेष फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एम.बी.ए. अभ्यासक्रमासाठी मागील वर्षी व चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने घेतलेली प्रवेश परीक्षा दिली होती, अशा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पहिल्या टप्प्यात झाली आहे. तथापि, ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा देऊनही अद्याप प्रवेश निश्चित केला नाही, त्यांच्यासाठी ३ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता प्रवेश फेरीचे आयोजन केल्याची माहिती उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी दिली. एमबीए प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थांनी प्रवेशासाठी मुख्य कार्यालय, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे प्रत्यक्ष कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

पुढारी

# ३६ हजार ३४३ पदवीधर मतदार पात्र



शिवाजी विद्यापीठ निवडणूक

## दुरुस्त मतदार यादी प्रसिद्ध; १२ ला अंतिम मतदार यादी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रियेंतर्गत मतदारांच्या तक्रार अर्जांची पडताळणी व योग्य दुरुस्त्या करून १ ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा दुरुस्त मतदार यादी प्रसिद्ध झाली. दुरुस्त यादीनुसार ३६ हजार ३४३ पदवीधर मतदार पात्र ठरले आहेत. ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत दुरुस्त मतदारयादी संदर्भात कुलगुरूंकडे आक्षेप नोंदविता येणार आहेत. १२ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. शैक्षणिक संस्था, संघटनांच्या वतीने रणनीती आखण्याचे काम सुरू झाले आहे. अर्जांची छाननी करून विद्यापीठाने दुरुस्त मतदार यादी शनिवारी जाहीर केली. १४ ऑक्टोबरला निवडणूक सूचना प्रसिद्ध होईल. ३१ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करून वैध, अवैध उमेदवारी अर्ज जाहीर होतील.

१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून निकाल जाहीर होईल.

पुण्यनगरी

# एमबीए रिक्त जागांसाठी प्रवेश फेरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी सोमवारी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा देऊनसुद्धा अजूनही प्रवेश निश्चित केलेला नाही, त्यांच्यासाठी या फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे आणि संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.

03 OCT 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ निवडणूक; दुरूस्त मतदार यादी प्रसिद्ध

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ निवडणूक प्रक्रियेतील तिसरा टप्पा म्हणजे मतदारांच्या आलेल्या तक्रार अर्जांची पडताळणी आणि योग्य दुरूस्त्या करून १ ऑक्टोबर रोजी दुरूस्त मतदार यादी मध्यरात्री १२ वाजता जाहीर झाली. दुरूस्त यादीनुसार ३६,३४३ पदवीधर मतदार पात्र ठरले आहेत. गुरुवारी ६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत दुरूस्त मतदार यादीसंदर्भात काही आक्षेप असल्यास कुलगुरूंकडे तक्रार करायची आहे. १२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

विद्यापीठ निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणूक आणि आवक-जावक विभागातील कर्मचाऱ्यांनी सुट्टीच्या दिवशीही काम करून मतदारांच्या दुरूस्त्या व आक्षेप अर्ज स्वीकारले. या अर्जांची छाननी करून दुरूस्त मतदार यादी शनिवारी मध्यरात्री जाहीर केली. या दुरूस्त मतदार यादीसंदर्भात प्राप्त अर्जांची छाननी करून अंतिम मतदार यादी १२ रोजी जाहीर केली जाणार आहे. १४ रोजी निवडणूक सूचना प्रसिद्ध होईल. ३१ ऑक्टोबरला उमेदवारी अर्जांची छाननी करून वैध, अवैध उमेदवारी अर्ज जाहीर होतील. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाचे आहेत. २ नोव्हेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्जांच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे तक्रार करावी. ३ नोव्हेंबर रोजी अंतिम पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध होईल. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मतदान होईल. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरूवात होणार असून निकाल जाहीर होईल.



- **मतदार यादी दुरूस्तीनंतर ३६,३४३ मतदार पात्र**
- **१२ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार अंतिम यादी**

**संघटनांची मोर्चेबांधणी**

प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी, महाविद्यालयीन, विद्यापीठ प्राध्यापक, नोंदणीकृत पदवीधर अधिसभा सदस्य, विद्यापरिषदेवर, अभ्यासमंडळ आदी पदांसाठी ही निवडणूक होणार आहे. त्यामुळे विद्यापीठ विकास आघाडी, सुटा आणि आजी-माजी विद्यार्थी संघटनेने जोरदार तयारी सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**अधिकार मंडळानुसार पात्र उमेदवारांची संख्या**

| पद | संख्या |
|---|---|
| पदवीधर | ३६,३४३ |
| शिक्षक मतदार संघ | २९५३ |
| बीओएस महाविद्यालय विभागप्रमुख | ९३७ |
| प्राचार्य मतदार संघ | ९३ |
| संस्थाचालक मतदार संघ | ११७ |